# काश्मिरी नवरचना

जम्मू आणि काश्मीर या राज्यातून लडाख बाहेर काढल्यानंतर फेररचना संपली नव्हती. जम्मू आणि काश्मीर तसेच लडाख हे दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश जन्माला आले असले तरी जम्मू-काश्मीर हा विधानसभा असणारा केंद्रशासित प्रदेश असणार होता. अशीच विधानसभेची तरतूद पुदुचेरी या केंद्रशासित प्रदेशातही आहे. आज जम्मू-काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट असली तरी कधी ना कधी तेथे निवडणुका होतीलच. त्या होताना जम्मू-काश्मीर विधानसभेचे चित्र आता पूर्वीसारखे असणार नाही. लडाख राज्यातून बाहेर पडल्याने त्या चार जागा कमी झाल्या होत्या. ८७ आमदारांच्या विधानसभेतील त्या चार जागा गेल्याने ८३ जागा उरल्या होत्या. त्या आता वाढवून ९० करण्यात आल्या आहेत. मात्र, या ९० जागांमधील ४३ जागा आता जम्मू विभागातील असणार आहेत. काश्मीर विभागाची केवळ एक जागा वाढली असून त्या ४७ झाल्या आहेत. याशिवाय, २४ जागा या पाकव्याप्त काश्मीरमधील भूभागासाठी आहेत. या नव्या रचनेमुळे केंद्रशासित जम्मू-काश्मीरचा पुढचा मुख्यमंत्री जम्मू विभागातला म्हणजेच हिंदू असेल, अशी अटकळ सध्या बांधली जात आहे. जम्मू आणि काश्मीर यांच्या मतदारसंघांच्या फेररचेनकडे या नजरेने पाहावे का, हा प्रश्नच आहे. याचे कारण, मतदारसंघांची फेररचना जर लोकसंख्येच्या प्रमाणात झाली असेल तर तिच्याकडे धार्मिक रंग लावून पाहणे, उचित ठरणार नाही. एकीकडे भारताची राज्यघटना आणि दुसरीकडे, जम्मू-काश्मीर या राज्याची स्वत:ची घटना; अशा कोंडीत या राज्यातली निवडणूक प्रक्रिया सापडली होती. म्हणजे, लोकसभेच्या निवडणुका या केंद्रीय कायद्यातील तरतुदीनुसार आणि राज्यातील निवडणुका मात्र राज्याच्या स्वतंत्र घटना व कायद्यानुसार, अशी ही विभागणी होती. ती तर्कदुष्ट होती. पाच ऑगस्ट, २०१९ रोजी जम्मू-काश्मीरची स्वतंत्र घटनाच निकाली निघाली असल्याने तेथील स्वतंत्र निवडणूक कायद्यालाही काही अर्थ राहिलेला नाही. त्यामुळे, मतदारसंघांच्या नव्या रचनेसाठी सरकारने तेव्हाच निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघ पुनर्रचना आयोग नेमला होता. या आयोगाने आपल्या अहवालात ज्या शिफारसी केल्यात; त्यात प्रथमच या केंद्रशासित प्रदेशात अनुसूचित जमातींसाठी नऊ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. स्वातंत्र्यानंतर देशातील सर्व राज्यांमधील अनुसूचित जाती आणि जमातींना लोकप्रतिनिधित्व मिळाले. मात्र, काश्मिरात ते आजतागायत मिळू शकले नव्हते. याचबरोबर, विस्थापित काश्मिरी पंडितांसाठी विधानसभेत दोन जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या जागांवर राज्यपाल दोन सदस्यांना नामनियुक्त करू शकतील. ही फार महत्त्वाची तरतूद असून विस्थापित काश्मिरी पंडितांना नव्या जम्मू-काश्मीरमध्ये सामावून घेण्यासाठी ती उपयुक्त ठरणार आहे. काश्मिरातील काही पक्षांनी या नव्या रचनेवर टीका केली आहे. त्यात माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती आघाडीवर आहेत. भारतीय राज्यघटनेचा यात अनादर झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसे त्यांना वाटत असेल त्या किंवा इतरही नेते सर्वोच्च न्यायालयात या नवरचनेला आव्हान देऊ शकतात. मुळात, केंद्रशासित प्रदेश असताना मुख्यमंत्री कुणीही झाला तरी निर्वाचित सरकारचे अधिकार मर्यादित असणार आहेत. सत्तेची खरी सूत्रे ही केंद्र सरकारच्याच हातात राहणार आहेत. इतर साऱ्या देशातील मतदारसंघरचना सन २०२६ पर्यंत गोठविण्यात आलेली असताना फक्त काश्मीरचा अपवाद का, असाही प्रश्न काहीजण करीत आहेत. मात्र, जम्मू-काश्मीरमधील स्थानिक तसेच विधानसभेच्या निवडणुका आधीपासूनच केंद्रीय कायद्यानुसार होत असत्या तर हा प्रश्न आला नसता. तशा त्या होत नसल्यानेच आज ही फेररचना अटळ ठरली आहे. जम्मू-काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी किंवा भाजप, काँग्रेस या राष्ट्रीय राजकीय पक्षांनी या राज्याचा विचार हिंदू व मुस्लिमबहुल अशा लोकसंख्येच्या विभागणीनुसार करता कामा नये. तसा तो झाल्यानेच आजवर काश्मीरचे खूप नुकसान झाले आहे. ही मतदारसंघांची फेररचना म्हणजे काश्मिरातील मुस्लिमांना शक्तिहीन व निष्प्रभ बनविण्याचे कारस्थान आहे, अशी टीका पाकिस्तानच्या परराष्ट्र खात्याने केली आहे. आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी भारताच्या हंगामी राजदूतांना तेथे पाचारण करण्यात आले होते. पाकिस्तानची ही भूमिका एका बाजूला जातीयवादी आणि दुसरीकडे, भारताच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करणारी आहे. भारतातील पक्षांनीही उद्या ही नवरचना धार्मिक आधारावर केली आहे, अशी टीका केली तर ते एका अर्थाने पाकिस्तानच्या भूमिकेची पुष्टी करणे होईल. सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींनी दिलेल्या या अहवालानुसार जम्मू-काश्मीर विधानसभेची निवडणूक झाली तर ती काश्मीरची नवी सुरुवात ठरू शकेल. जम्मू-काश्मीरचा मुख्यमंत्री हिंदू होतो की मुस्लिम होतो; यापेक्षा तो राज्यातील जनतेच्या भल्यासाठी उद्या काम करतो का, हे अधिक महत्त्वाचे आहे. भारतीय राज्यघटनेतील 'सेक्युलॅरिझम'च्या तत्त्वालाही तेच अनुरूप असेल. पावसाळा संपल्यावर काश्मिरातील निवडणूक खरेच होणार असेल तर त्या निवडणुकीचा अजेंडा हा काश्मीरच्या विकासाचा असावा. जुन्याच धार्मिक विद्वेषी चर्चांना आता पूर्णविराम द्यायला हवा.

# समन्वय समितीच्या बैठकीत कवेळे धरणाचे पाणी पेटले ; ग्रामस्थ आक्रमक

## पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची गैरहजेरी



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्याची नुकतीच समन्वय समिती व पुनर्विलोकन कमिटी स्थापन झाल्यानंतर या कमिटीची पहिलीच बैठक तहसील कार्यालयाच्या हिरकणी कक्षात समन्वय समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष अभिजित चांदोरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी सर्व प्रथम नवनिर्वाचित समन्वय समितीचे अध्यक्ष व सदस्यांचे वृक्ष संवर्धनाचा संदेश देत एक रोपटे देऊन प्रशासनाने स्वागत केले.

यावेळी समन्वय समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या अधिकारी वर्गाकडून त्यांच्याकडे असलेल्या खात्याचा आढावा घेतला. यावेळी एमएसआरडीसी, पाटबंधारे, एस् टी महामंडळ तसेच अन्य विभागातील अधिकारी वर्ग या बैठकीला उपस्थित नव्हते त्यांना नोटीस बजावण्यात आली.

त्याचबरोबर तालुक्यातील भेडसावणाऱ्या समस्या संदर्भात चर्चा करण्यात आली त्यावेळी खवली ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या कवेळे धरणाचे पाणी ग्रामपंचायत व गावांना पूर्व सूचना न देता दुरुस्ती साठी सोडण्यात आल्याने वाघोशी व खवली ग्रामपंचायत हद्दीतील गावांवर पाणीटंचाईचे संकट निर्माण झाल्याने ग्रामस्थांनी आक्रमक होऊन समन्वय समितीच्या बैठकीत विषय मांडला.

त्यावर अध्यक्ष अभिजित चांदोरकर यांनी यामधे पाट बंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची पूर्णतः चूक आहे त्यांनी ग्रामस्थांना विश्वासात घेणे गरजेचे होते मात्र त्यांनी तस केले नाही परंतु याचा संबंधित अधिकाऱ्यांना प्रश्न विचारला जाईल. व यावरती उपाययोजना केली जाईल असे यावेळी चांदोरकर म्हणाले.

तसेच अनेक समस्या बाबत, पावसाळा पूर्वी करण्यात येणाऱ्या कामांबाबत त्या त्या संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा केली व केलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा घेतला. यावेळी समन्वय समितीचे राजेंद्र राऊत, दीपक पवार, प्रकाश आवस्कर, राजेश कानाडे, किसन उमटे, स्वेता मालुसरे, इरम पानसरे तसेच तहसीलदार दिलीप रायन्नावर, पोलीस निरीक्षक विश्वजित काईंगडे, गट विकास अधिकारी विजय यादव,नायब तहसीलदार वैशाली काकडे आदींसह सर्व शासकीय व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# खा.सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून साकारणार आदिवासी सांस्कृतिक भवन

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात खा.सुनील तटकरे यांच्या संकलपानेतून भव्य आदिवासी सांस्कृतिक भवन साकारण्यात येत असल्यामुळे आदिवासींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, आदिवासी सांस्कृतिक भवन उभारण्यात यावे, ही गेली अनेक वर्षे आदिवासी समाजाची मागणी होती.आदिवासी समाजातील लोककला, सामूहिक लग्न, परंपरागत सण, उत्सव आणि त्यांच्यातील उपजत कलागुणांना व सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना देण्याच्या दृष्टीने आदिवासी भागामध्ये जागा उपलब्ध नसते. जागेचा प्रश्न प्रलंबित होता राष्ट्रवादी काँग्रेसचे मागासवर्गीय सेलचे रायगड जिल्हा अध्यक्ष ड.उत्तम जाधव आणि कैलास पायगुडे यांनी आदिवासी समाजासाठी तळा शहरात जागा उपलब्ध करून दिली आणि खा.सुनील तटकरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला काल ( दि.६ मे)खा.तटकरे यांनी जागेची पाहणी केली आणि तळा शहरात आदिवासी सांस्कृतिक भवन होणार यावर श्किामोर्तब झाले.



तळा शहरात आदिवासी भवन बांधण्यात येणार असल्यामुळे या समाजात असलेले कौशल्य व इतर गुणांना वाव मिळणार आहे. आणि त्यांच्यात असलेले कौशल्य आणि सांस्कृतिक बुजरेपणा घालविणे यासाठी सांस्कृतिक भवनाचा उपयोग होणार आहे.आदिवासी संस्कृतीचे जतन व्हावे, आदिवासी लोककलेला व्यापक स्वरूप मिळावे, आदिवासींना त्यांना हक्काची जागा प्राप्त व्हावी याकरिता आदिवासी उपाययोजनेतून आदिवासी सांस्कृतिक भवन साकारले जाणार असून आदिवासी समाजामध्ये आनंदाचे वातावरण आहे.आदिवासी समाजाने खा.सुनील तटकरे यांचे विशेष आभार मानले आहेत.

# आदर्श युवा संघटनेच्या वाचनालयाचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । पेण**

आदर्श युवा संघटना गडब या संघटनेच्या वाचनालयाचे उदघाटन एच. आर. जॉन्सन कंपनीचे जनरल मॅनेजर अरविंद जोशी यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी गडब सरपंच अर्पणा कोठेकर, उपसरपंच दर्शना पाटील, सदस्या सुर्वणा म्हात्रे, वडखळ सहाय्यक पोलिस निरिक्षक नरेंद्र बेलदार, संघटनेचे संचालक के.पी. पाटील, अध्यक्ष के.जी. म्हात्रे, उपाध्यक्ष तुलशिदास कोठेकर, सचिव कमलेश ठाकुर, चित्रकार प्रकाश पाटील, खगोल अभ्यासक प्रज्ञेश म्हात्रे, दिनेश भोईर आदिसह संघटनेचे सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

वृत्तपत्राचे जिवनात महत्वाचे स्थान आहे, वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी वाचनालय होणे गरजेचे आहे. आदर्श युवा संघटनेचे कार्य महत्व पुर्ण आहे. असे एच. आर जॉन्सन कंपनीचे जनरल मॅनेजर अरविंद जोशी यांनी सांगितले. या वेळी संघटनेचे संचालक के.पी. पाटील, सदस्य चित्रकार प्रकाश पाटील, खगोल अभ्यासक प्रज्ञेश म्हात्रे यांचा सत्कार करण्यात आला.



# कोंढाणे धरणातील वीस टक्के पाणी सिंचनासाठी द्या अन्यथा एक इंचही माती काढू देणार नाही : सुनील गोगटे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'कोंढाणे धरण होणार आहे. मात्र आजी - माजी आमदारांची श्रेयवादाची लढाई सुरू आहे. माजी आमदारांनी आपली भूमिका बदलली आहे. आता तयार केलेल्या आराखड्यात सिंचनाच्या पाण्याचा कुठेही उल्लेख नाही. या धरणातील वीस टक्के पाणी सिंचनासाठी मिळावे जेणे करून २५४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल तसेच काठावर असलेल्या ग्रामपंचायती व कर्जत नगरपरिषदेच्या नळ पाणी पुरवठा योजनांसाठी मिळावे आणि मुख्य म्हणजे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा. योग्य पुनर्वसन व्हावे या आमचे हक्काचे पाणी मिळावे अन्यथा एक इंचही माती काढू देणार नाही.' असा इशारा भारतीय जनता पक्ष किसान मोर्चा कोंकण संपर्क प्रमुख सुनील गोगटे यांनी पत्रकार परिषदेत दिला.



सुनील गोगटे यांनी विठ्ठल नगर मधील संपर्क कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या वेळी माहिती सांगताना, '२०१० साली कोंढणे धरणासाठी माजी आमदार सुरेश लाड यांनी कोंढाणा धरण संघर्ष समितीच्या वतीने मंत्रालयापर्यंत पायी दिंडी काढली होती. त्यामध्ये मी होतो. तसेच हे धरण शासनाने बांधावे. सिडकोला देऊ नये म्हणून लाड यांचा विरोध होता. हा विरोध अगदी काल परवा पर्यंत होता. मात्र अचानक त्यांनी घुमजाव का केले? हे समजले नाही उलट या नवीन आराखड्यात सिंचना बद्दल कोणताही उल्लेख नाही तरी 'कर्जतकरांना दिलासा कसा मिळू शकतो?' असा प्रश्न उपस्थित होतो. आमदार महेंद्र थोरवे आणि माजी आमदार लाड यांच्या जलसंपदा मंत्री जयंत पाटील आणि माजी जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांच्या बरोबर वेगवेगळ्या बैठका झाल्या आणि प्रत्येक जण मीच धरण आणले असे भासवीत आहेत पण वस्तुस्थिती वेगळी आहे. २०१० साली हे धरण ४४० कोटी रुपयांमध्ये होणार होते मात्र काही महिन्यांनी ते ६०० कोटी रुपयांवर गेले. 'ऑक्टोबर २०२१ मध्ये या धारणाबाबत नवीन आराखडा आला आहे. त्यात हे धरण १२०० कोटी रुपये खर्चावर गेले आहे. बारा वर्षांपूर्वी आमच्या जमिनींमध्ये २० - २५ फूट खड्डे खोदून माती काढली. २०१५ साली युतीचे सरकार असताना तत्कालीन मंत्री गिरीश महाजन यांनी शेतकऱ्यांना भुई भाडे द्यावे असे आदेश दिले होते. त्यातील एक छदामही कुणालाच मिळाला नाही. उलट १० - १२ वर्षांचे पीक काढता आले नाही. आता हे धरण होणार आहे ही चांगली गोष्ट आहे. विकासाला आमचा विरोध नाही मात्र आमचे हक्काचे पाणी मिळालेच पाहिजे शिवाय योग्य पुनर्वसन झाले पाहिजे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. अन्यथा एक इंचही माती आम्ही काढू देणार नाही.' असा इशारा गोगटे यांनी शेवटी दिला.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## दरोडा व जबरी चोरी करणाऱ्या टोळीला पनवेल तालुका पोलीसांनी केले गजाआड

पोना राकेश मोकल, पोशी भीमराव खताळ, तुकाराम भोये, पोना जयदीप पवार, पोना पंकज चांदीले, प्रकाश मेहेर, सुनिल कुदळे या पथकाने सदर आरोपींचा शोध सुरु केला असता गुप्त बातमीदारामार्फत मोबाइल विक्री करणाऱ्या व्यक्तीबाबत माहिती घेत असताना एक संशयित इसम खालापूर व उरण परीसरात मोबाइल विक्री करत असल्याची माहीती प्राप्त झाली तांत्रिक तपासात सदर इसमाचा प्रस्तुत गुन्हयात समावेश असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली.

सदर अटक केलेल्या इसमाकडे केलेल्या चौकशीत त्याचे इतर चार साथीदार हे खालापूर परीसरातील आदिवासी पाडयावर राहणारे अत्यंत चपळ, काटक व वेळप्रसंगी अचानक हल्ला करणारे आरोपी असल्याची माहीती मिळाली . गुन्हे प्रकटीकरण पथकाने सदर ०४ आरोपींच्या वास्तव्याबाबत माहीती घेवून खालापूर रसायनी , खोपोली परीसरातील अनेक आदिवासी पाडयावर अत्यंत सावधपणे वेळोवेळी सापळा रचून सदर आरोपीना शिताफिने अटक केली त्यामध्ये संजय पवार वय ३० वर्षे, रा.बीड खुर्द, पो. जावरूंग,ता. खालापूर, जि. रायगड, कुमार पवार वय २३ वर्षे , रा . बीड खुर्द , पो . जाबरूंग , ता . खालापूर , जि . रायगड , अविनाश धारपवार, वय २० वर्षे , रा वणवेवाडी , पो . ता . खालापूर , जि . रायगड, रितेश जाधव , वय १८ वर्षे , धंदा- बेकार , रा . जि . रायगड , रा . बीड खुर्द , पो . आंबरूंग , ता . खालापूर ,व अक्षय यावर वय २१ रा मोहोपाडा यांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडून विविध कंपनीचे २९ मोबाईल तसेच ,मोठ्या प्रमाणात रोख रक्कम हस्तगत केली आहे यांच्या अटकेमुळे पनवेल तालुका पोलीस ठाण्यातील २ गुन्हे उघडकीस आले आहेत,. या आरोपींची या पूर्वी खोपोली खालापूर पुणे ता ठिकाणी सुद्धा गुन्हे केल्याची माहिती मिळत आहे

## पनवेलच्या ग्रामपंचायतीना ब्रॉडब्रँड इंटरनेटची प्रतिक्षाच

फायबर नेटवर्कच्या केबल टाकण्याचे काम २०१७ मध्ये सुरु करण्यात आले. काही महिन्यातच हे काम पूर्ण करण्यात आले. प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये यासाठी बॉक्स बसविण्यात आलेले आहेत.

खासगी इंटरनेटची केबल तुटली किंवा काही अडचण आली तर ग्रामपंचायतीची कामे थांबतात. त्यामुळे जर ऑप्टिकल फायबर नेटवर्कने ब्रॉडबँड इंटरनेट चालू झाले तर हे सर्व प्रश्न सुटणार आहेत. मात्र गेल्या चार ते पाच वर्षापासून ग्रामपंचायती ब्रॉडब्रँड इंटरनेट सुरू होण्याची वाट पाहत आहेत.

## तळा नगरपंचायतीला निधी कमी पडू देणार नाही : खा.सुनील तटकरे

उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, माजी बाल कल्याण सभापती गीता जाधव, मागासवर्गीय सेल रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड.उत्तम जाधव, युवक अध्यक्ष नागेश लोखंडे, कैलास पायगुडे, किशोर शिंदे, प्रवीण अंबारले सर्व नगरसेवक नगरसेविका आणि तळेवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या भाषणात सुनील तटकरे यांनी गेली ३५ वर्षे समाजकारण आणि राजकारण करत असताना तळा तालुक्याने नेहमीच साथ दिली तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने पाठिंबा दिला म्हणून म्हणून कॅबिनेट मंत्री ते खासदार पर्यंत मजल मारू शकलो परंतु मधल्या कालखंडात तळा ग्रामपंचायत ते नगरपंचायतीमध्ये सत्ता आणु शकलो नाही याचे शल्य मनामध्ये होते.जानेवारीमध्ये नगरपंचायत निवडणुकीत जाहीर प्रचार सभेत फक्त एक वेळ सत्ता द्या.गेल्या पंधरा वर्षांचा विकासकामांचा बॅकलॉग भरून काढतो असे आश्वासन तळेवासियांना दिले होते तळेवसियांनी मोठ्या विश्वासाने साथ दिली आणि नगरपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेसची एक हाती सत्ता दिली. केवळ तीन महिन्यात तीन कोटी रुपयांचा निधी आणून दिला हा पहिला टप्पा आहे पुन्हा दुसरा तिसरा चौथ्या टप्प्यात याच्यापेक्षा दुप्पट निधी दिला जाईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

गेली १० वर्षे तळा शहर खूप मागे राहिले बाजूला असणारा रोहा तालुका,माणगाव तालुका खूप पुढे गेला परंतु आता शहरातील जनतेने आपली चूक सुधारली असून योग्य नेतृत्वाच्या हाती सत्ता दिल्यामुळे या शहराचा काया पालट होणार असल्याचे त्यांनी सांगितले.नव्याने मंजूर झालेली पाणी पुरवठा योजना अंतिम टप्प्यात असून तिचा आराखडा नगरपंचायतीने द्यावा त्यासाठी लागणारा निधी मग तो १० करोड असो किंवा २० करोड निधी देण्याची जबाबदारी सुनील तटकरे याची असेल असे त्यांनी सांगितले.निसर्गरम्य डोंगराळ भागात वसलेल्या तालुक्यात पुरातन वास्तू आहेत तळगड किल्ला, कुडा लेणी यांसाठी पालकमंत्री अदिती तटकरे यांनी निधी मंजूर केला आहे त्याचे कामही सुरू झालेले आहे. तालुक्यात रस्त्यांचे जाळे विणले गेले असून अलिबाग तळा ते साई १२५ करोडचा रस्ता मंजूर झाला आहे दळण वळणाची साधने उपलब्ध असून उद्योगधंदे आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

ते पुढे म्हणाले की,एका कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि उद्योगपती अडाणी यांच्यात बैठक सुरू होती या बैठकीमध्ये मी पालकमंत्री अदिती उपस्थित होतो.त्यावेळी पवार साहेबांनी रायगड येथील दिघी पोर्ट येथे कुठला उद्योग होऊ शकतो याची महिती सुनील तटकरे देतील असे सांगितले त्यावेळी खात्री पटली की भविष्यात येथील भूमी पुत्रांना देखील उदरनिर्वाहासाठी मुंबई ठाणे उपनगरात जाण्याची गरज भासणार नाही येथेच आपल्या भूमीत उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध होईल याची खात्री पटली असून त्या दृष्टीने काम सुरू आहे याचा सारखा दुसरा आनंद कोणता नाही असे सांगितले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर अध्यक्ष महेंद्र कजबजे यांनी केले तर आभार उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी मानले.कार्यक्रमासाठी तळा शहरवासीयांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

# सुधागड किल्ल्याला लवकरच राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

छ. शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सुधागड किल्ल्याला लवकरच राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळणार आहे. या संदर्भातील अंतिम अधिसूचना राज्य पुरातत्व विभागाने शासनाकडे म्हणजेच महाराष्ट्र सांस्कृतिक विभागाकडे मंजुरीसाठी नुकतीच पाठवली आहे. शिवाय किल्ल्याची दुरुस्ती व आराखडा तयार करण्यासाठी पाच कोटींचा निधी देखील मंजूर झाला असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

हा दर्जा मिळाल्यास किल्ल्याचे रूप पालटणार आहे. तसेच पर्यटन वाढीसह तालुक्यात रोजगार वृद्धी देखील होईल. याबरोबरच येथील दैदिप्यमान इतिहास उजेडात येणार आहे. यामुळे स्थानिकांसह इतिहास अभ्यासक व दुर्गप्रेमी सुखावले आहेत. राज्य सरकारने राज्य पुरातत्व विभागास सुधागड किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार राज्य पुरातत्त्व विभागाने मंत्रालयात नोटिफिकेशन पाठविले. २१ ऑक्टोबर २०२१ सुधागड किल्ल्याचा जतन दुरुस्ती आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने राज्य पुरातत्व विभाग सहाय्यक संचालक विलास वाहणे व त्यांच्या टीमने सुधागड किल्ल्याची तेथील वास्तू आणि जाणाऱ्या मार्गांची पाहणी केली. त्यानंतर किल्ल्याला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यासाठी अधिसूचना (नोटिफिकेशन) काढण्यासाठी मंत्रालयात प्रस्ताव पाठविण्यात आला. प्रथम अधिसूचना (नोटीफिकेशन) निघाल्यानंतर कोणी हरकती घेतल्या नाही. त्यामुळे आता अंतिम अधिसूचना काढण्यात आली आहे.

किल्ल्याचा जतन दुरुस्ती आराखडा बनविण्यासाठी तसेच किल्ल्याचा महादरवाजा व तेथपासून पडलेल्या भिंती व पाच्छापूर बाजूकडील दरवाजा दुरुस्ती आणि इतर किरकोळ दुरुस्ती



यासाठी निधी मंजूर झाला आहे. याची निविदा तयार झालेली असून ती मंजुरीसाठी पाठविण्यात आली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील काही किल्ल्यांचा विकास आराखडा तयार करण्यासाठी ५-६ किल्ले निवडले आहेत. पथदर्शी स्वरूपात हे किल्ले निवडून या किल्ल्याचा विकास करण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांनी एक समिती देखील नेमली आहे. कोकणातील सुधागड, सिंधुदुर्ग व विजयदुर्ग या ३ किल्ल्यांचा त्यात समावेश आहे. त्यातील रायगड जिल्ह्यातील सुधागड हा एकमेव किल्ला निवडण्यात आला आहे. त्यातील सिंधुदुर्ग व विजयदुर्ग हे किल्ले केंद्राने संरक्षित केले आहेत. मात्र सुधागड किल्ला अजून पर्यंत असंरक्षित असल्याने त्याला संरक्षित केले जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पालीमध्ये राजर्षी शाहू महाराजांना १०० सेकंद स्तब्ध उभे राहून अभिवादन

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राजर्षी शाहू महाराज यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्त शुक्रवारी (ता.६) पालीमधील नागरिक, तहसीलदार व पदाधिकाऱ्यांनी १०० सेकंद स्तब्ध उभे राहून शाहू महाराजांना अभिवादन केले. यावेळी शाहू महाराजांच्या विचारांचे आणि कार्याचे स्मरण केले गेले. सामाजिक समतेचे प्रणेते लोकराजे छ. शाहू महाराज यांनी जातीयतेला समूळ नष्ट करण्याबरोबरच माणसातील भेदाभेद समूळ नष्ट करण्यासाठी मोलाचे काम केले, छ. शाहू राजांनी सामाजिक समतेची बीजे रोवली. असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी पाली–सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार, ह. भ. प. महेश पोंगडे महाराज, शेतकरी नेते शरद गोळे, भाजप दक्षिण रायगड उपजिल्हाध्यक्ष राजेश मपारा, बशीर परबलकर व सुभाष मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## तलावात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील जावळे गावात असलेल्या तलावात एका मुलाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत .

जावळे गावात असलेल्या तलावात सात ते आठ वयोगटातील एका इसमाचा मृतदेह आढळून आला आहे सदर मृतदेहांची ओळख पटली नसून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत .

## बांबूच्या दांडक्याने केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जुन्या भांडणाचा राग मनात धरून घरावर दगड मारत असताना त्याचा जाब विचारण्या करता संतोष नाईक गेले असता त्याना बांबूच्या दांडक्याने मारहाण करण्यात आली आहे. आरोपीविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जावळे गाव येथील संतोष मधुकर नाईक यांचा रिक्षाचा व्यवसाय आहे. ते झोपण्याची तयारी करत असताना त्यांच्या घराच्या भिंतीवर दगड मारण्याचा आवाज आला. त्यांनी बाहेर जाऊन पाहिले असता घराशेजारी राहणाऱ्या गणेश जोमा घरत (वय ३५, राहणार जावळे) हा दिसला. त्याला दगड का मारतो असे विचारले असता त्याने शिवीगाळ केली व हातातील लाकडी बांबूच्या दांडक्याने संतोष नाईक यांना डोक्यावर मारले. यात ते जखमी झाले. गणेश जोमा घरत याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पुराच्या पाण्याचा प्रश्न सोडवला नाही तर कर्जत रेल्वे स्थानकावर रेलरोको : महेंद्र थोरवे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'कर्जत – पनवेल रेल्वे लाईन टाकल्यापासून या परिसरातील शंभरच्या वर कुटुंबांना दर पावसाळ्यात जीव मुठीत धरून रहावे लागते. पावसाळ्यात तीन – चार वेळा पाणी येत असल्याने या परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होते. ही समस्या दूर करण्यासाठी संबंधित विभागांशी पत्रव्यवहार केला परंतु पावसाळा दीड महिन्यावर आला तरी अद्याप काहीही ठोस उपाय योजना केली नसल्याने या परिसरातील पुराच्या पाण्याचा प्रश्न मध्य रेल्वे प्रशासनाने सोडविला नाही तर कर्जत रेल्वे स्थानकावर १५ जून नंतर कधीही रेलरोको आंदोलन करण्यात येईल. असा इशारा आमदार महेंद्र थोरवे यांनी मध्य रेल्वे प्रशासनाला निवेदन पाठवून दिला आहे.



कर्जत तालुक्यातील किरवली ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या ज्ञानदीप वसाहती मध्ये कर्जत – पनवेल रेल्वे लाईनमुळे नेहमीच पुराचे पाणी येते. गेली पंधरा – सोळा वर्ष या पाण्याचा बंदोबस्त करावा म्हणून येथील रहिवासी मध्य रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार करीत होते. मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. अखेर हा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी हाती घेतला आणि त्यांनी रेल्वे प्रशासनाकडे विविध माध्यमातून पाठपुरावा सुरू केला. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात रेल्वे प्रशासनाचे संबंधित अधिकारी पाहणीसाठी आले. त्यावेळी तेथील रहिवाशांनी आपल्या समस्या मांडल्या. तरीही ठोस उपाय योजना होत नव्हती. नंतर ओसवाल यांनी पुन्हा पाठपुरावा सुरू केला आणि रेल्वे प्रशासनाने सभा आयोजित केली. रेल्वेचे अधिकारी अनिल हिवाळे यांनी रहिवाशांच्या समस्या समजावून घेण्यासाठी सभेत उपस्थिती दर्शविली होती.

१३ नोव्हेंबर २०२१ रोजी ज्ञानदीप वसाहतीतील महेंद्र देशमुख यांच्या निवासस्थानी सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, पंकज ओसवाल, किरवलीचे सरपंच संतोष सांबरी, माजी उपसरपंच बिपीन बडेकर, पंकज पाटील, नगरसेवक संकेत भासे, अनिल व्हजगे, राहुल वैद्य, केतन बोराडे आदींसह रहिवासी उपस्थित होते. त्यानंतर डॉ. अपर्णा फडके आणि निखिल गवई यांनी दृक्श्राव्य पद्धतीने पूर परिस्थिती व त्यावर काय उपाय करायला हवेत? ते अगदी अभ्यासपूर्ण सादर केले होते.

या परिस्थितीची वेळो वेळी पाहणी करून यावर ठोस उपाय करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या आमदार महेंद्र थोरवे यांनी 'उगाचच वेळ न घालवता भविष्यात पूरपरिस्थिती निर्माण होणार नाही त्यासाठी रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर उपाय योजना करावी. अन्यथा आम्हाला वेगळे पाऊल उचलावे लागेल.' असा इशारा दिला होता. त्यावर 'याबाबतीत रेल्वे बोर्डा कडे प्रस्ताव सादर केला आहे. त्याच्या मंजुरीची आम्ही वाट पहात आहोत.' असे मध्य रेल्वे प्रशासनाने १५ नोव्हेंबर २०२१ रोजी कळविले होते. आता दीड महिन्यावर पावसाळा आला आहे. त्यामुळे पुराच्या पाण्याची भीती तेथील रहिवाशांना वाटत आहे. आमच्या भावना रेल्वे बोर्डाला कळवाव्यात तसेच ३१ मे २०२२ पूर्वी रेल्वे महाव्यवस्थापकांनी तातडीची सभा आयोजित करावी. १० जून पर्यंत याबाबत ठोस उपाय योजना करावी. अन्यथा १५ जून नंतर केंव्हाही कर्जत रेल्वे स्थानकात रेलरोको आंदोलन करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी रेल्वे प्रशासनाची असेल.' असा इशारा आमदार थोरवे यांनी रेल्वे प्रशासनाला निवेदन पाठवून दिला आहे.

# सरपंच ग्रामसेवक तलाठी यासाठी आपत्ती व्यवस्थापन शिबिर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी कल्याणकर उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे सर्व प्रशासकीय अधिकारी सरपंच तसेच ग्रामसेवक यांच्या उपस्थितीत आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षा शिबिराचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आले होते सदर कार्यक्रमास तहसीलदार दळवी रायगड भूषण आपत्ती तज्ञ जयपाल पाटील अनिकेत पाटील कैलास चौलकर यांचे मार्गदर्शन लाभले.



यावेळी तहसीलदार मीनल दळवी म्हणाल्या कोणत्याही आपत्ती च्या वेळी ग्रामस्थांनी कायम सतर्क राहून आमच्याकडे संपर्क करावा तसेच शेजारच्या गावात कोणती आपत्ती आल्यास त्यानाही मदतीला जावे,जेष्ठ नागरिक व गुरे ढोरे शेतकरीना मदत करावी,कार्यक्रमाचे प्रस्तावित तालुका आपत्ती प्रमुख नायब तहसीलदार अजित होळकर उपस्थित होते मार्गदर्शन करताना जयपाल पाटील यांनी दिन दिन जीवनातील अपत्ती बाबत या शैलीत माहिती दिली प्रत्येकाने सतर्क राहून आपत्तीचा सामना करणे आवश्यक आहे ती प्रत्येकाला व्यवस्थापनाची माहिती असणे आवश्यक आहे आपत्तीत संकट ग्रस्तांना पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी देखील प्रत्येकाने आपापला सहभाग देणे आवश्यक आहे धुताना थेट पाइपचा वापर ऐवजी २ बालदया मध्ये पाणी घेऊन त्याने गाडी घेतल्यास पाण्याची नासाडी देखील काढली जाईल व्यायाम देखील होईल याची माहिती तर अपघात प्रसंगी १०८ रुग्णवाहिका, वाहतूक पोलीस आणि महिला सुरक्षेसाठी ११२ पोलीस क्रमांक चा आपत्तीमध्ये वापर कसा करावा हे सांगितले,तर अनिकेत पाटील आपत्ती प्रशिक्षक यांनी आपत्ती बाबत व आग प्रतिरोधक यंत्राचा वापर कसा करायचा याचे प्रत्यशिक दिले.

आपण अधिकारी सागर पाठक यांनी देखील आपत्ती संदर्भातील माहिती देताना प्रत्येक ग्रामपंचायतीने आराखडा प्रथम तयार करावा असे सांगितले. ओडिसा येथे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेऊन आलेले सहाय्यक गटविकास अधिकारी डॉ. कैलास चोलकर यांनी आपले अनुभव सांगून या संदर्भातले मार्गदर्शन केले या कार्यक्रमास १०० हून अधिक अधिकारी आणि कर्मचारी यांनी उपस्थिती नोंदविली तसेच कार्यक्रमाचा लाभ घेतला सदर कार्यक्रमास अचानक उद्भवणाऱ्या आपत्तीमध्ये कोणती दक्षता घ्यावी तसेच यंत्रणेला कसे सहकार्य करावे यावर मान्यवर व त्यांनी मार्गदर्शन केले

# रेल्वेच्या धडकेने वृद्ध महिलेचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल बेलापूर ते पनवेल रेल्वे स्टेशनदरम्यान रेल्वे लाईन क्रॉस करताना रेल्वेची धडक लागून एका ६० वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

या महिलेबाबत कोणतीही माहिती नसल्याने पोलीस या महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. २५ एप्रिल रोजी ही वृद्ध महिला रेल्वे लाईन क्रॉस करीत असताना बेलापूर ते पनवेल दरम्यान तिला रेल्वेची धडक लागून ती जखमी झाली. तिला उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र त्याआधीच तिचा मृत्यू झाला होता.

या महिलेची उंची अंदाजे ४ फूट ८ इंच, अंगाने सडपातळ, डाव्या हातावर अस्पष्ट गोंदलेले व अंगात मळकट सफेद हाफ शर्ट व फिक्कट भगवी लुंगी परिधान केली आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.


राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड.सुजाता आर. पलंगे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.१५४०/२०२१
नि.नं.१९/ड
ने.ता.१३/०६/२०२२

१) श्री.प्रसाद पुंडलिक धोंड (मयत)
यांचे कायदेशीर वारस म्हणून
१/१) श्रीमती.सुरूची प्रसाद धोंड
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
१/२) श्री.अभिषेक प्रसाद धोंड
वय : ३० वर्षे, धंदा : व्यवसाय
१/३) श्री.अनिकेत प्रसाद धोंड
वय : २२ वर्षे, धंदा : व्यवसाय
तिघेही रा.बालाजी आंगण, ए विंग, बारावा मजला,
फ्लॅट नं.१२०५/१२०६, एस.टी.बस डेपो जवळ,
पनवेल, जि.रायगड–४१०२०६
२) गौरांगी व्यंकटेश गवाणकर
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.डी/३–४१, न्यू चंद्रा को.ऑप.हौ.लि.,
वीरा देसाई रोड, ऑफ लिंक रस्ता, आझाद
नगर, अंधेरी वेस्ट, मुंबई–४०००५३
३) श्री.पुंडलिक लक्ष्मण धोंड
वय : ९१ वर्षे, धंदा : काही नाही
रा.दुसरा मजला, आर.बी.धुरू वाडी,
३७२/अे वीर सावरकर मार्ग, दादर,
दादर वेस्ट, मुंबई–४०००२८ ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार क्र.१/१ यांची सासू, अर्जदार क्र.१/२ व १/३ यांची आजी, अर्जदार क्र.२ कै.उषा पुंडलिक धोंड यांची मुलगी आहे व अर्जदार क्र.३ हे कै.उषा पुंडलिक धोंड यांचे पती आहेत. कै.उषा पुंडलिक धोंड ह्या दि.०३/०१/२०२० रोजी मुक्काम पनवेल येथे मयत झाल्या असून त्या मु.पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील रहिवासी होत्या. कायद्यातील तरतुदीनुसार कै.उषा पुंडलिक धोंड यांचे अर्जदार क्र.१/१ ते १/३, २ व ३ हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.उषा पुंडलिक धोंड ह्या हयात असताना त्यांचे नावे स्वकष्टार्जित, स्वतःच्या मालकीची जी काही जंगम स्वरुपाची मालमत्ता आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :–

**जंगम मालमत्ता तपशिल खालीलप्रमाणे :–**

अ) बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा पनवेल मधील पी.पी.एफ. खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे :–

| | बँकेचे नाव | खाते क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा पनवेल | ४४९/९९–२०२० नवीन नं. २०१२१६७३४३६ | रु.५,६२,८६९/–(सक्सेशन सर्टीफिकेटसाठी अर्ज दाखल करून त्याचा निकाल मिळेपर्यंतची व्याजासह होणारी रक्कम) |

ब) म्युच्युअल फंडमधील गुंतवुकीचा तपशिल खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | तपशिल | फोलिओ नंबर | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एच.डी.एफ.सी. इन्कम फंड | ५५४६४२९/९३ | १,११,७५७.५९ (अंदाजे रक्कम) |
| | एच.डी.एफ.सी. मिड कॅप अपॉरच्युनिटी फंड | ५५४६४२९/९३ | १,४०,६९१.७५ (अंदाजे रक्कम) |

वर वर्णन केलेली मिळकत कै.उषा पुंडलिक धोंड यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांचे नावे होणेकरिता आवश्यक ते सक्सेशन सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, सदर मिळकतीबाबत कै.उषा पुंडलिक धोंड यांचे कायदेशीर वारस असल्याचे सक्सेशन सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदरच्या सक्सेशन सर्टीफिकेटचे कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास, सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलांमार्फत सादर कराव्यात. सदर नोटीशीच्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभात वारस दाखला (सक्सेशन सर्टीफिकेट) दिले जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.६/५/२०२२ रोजी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल


# इनरव्हील क्लब पनवेल सिटीच्या अध्यक्षपदी हेतल जितेंद्र बालड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी या नुतन क्लबचा पदग्रहण समारंभ आणि सनद प्रदान सोहळा पनवेल जिमखाना येथे शनिवारी (३० एप्रिल) थाटात संपन्न झाला. समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणुन इनरव्हील डिस्ट्रीक्ट ३१३ च्या जिल्हाध्यक्षा संतोष सिंग तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा सचिव डॉ. शोभना पालेकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने आणि गणेश वंदनेने झाली. इनरव्हील क्लब पनवेल सिटीच्या संस्थापक अध्यक्षपदी सर्वानुमते हेतल जितेंद्र बालड यांची तर सचिवपदी गिरा चौहान, उपाध्यक्षपदी ध्वनी तन्ना, खजिनदारपदी वैशाली कटारिया, मिनी राजपूत आय.एस.ओ., बिजल मिराणी संपादकपदी, ममता ठक्कर क्लब करसपॉन्डंट , तर वैशाली ठक्कर यांची सहसचिवपदी नियुक्ती करण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नूतन अध्यक्षा हेतल बालड यांना सनद आणि कॉलर टाळ्यांच्या गजरात सूपूर्द करण्यात आली. संपादक बिजल मिराणी यांनी संपादीत केलेल्या उर्जा या क्लब बुलेटीनचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. क्लबच्या या स्थापनादिनाचे औचित्य साधून क्लब तर्फे ज्ञानदीप फाऊंडेशन या अनाथआश्रमाला किराणा सामान देण्यात आले.



नव्याने स्थापन झालेल्या या इनरव्हील क्लब पनवेल सिटीचा पालक क्लब इनरव्हील क्लब न्यू पनवेल हा आहे. इनरव्हील क्लब न्यू पनवेलच्या अध्यक्षा स्मृती बिश्वास यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तर सचिव शिल्पा राजपूत या कार्यक्रमासाठी एम.ओ. सी. होत्या. झोनल सब को–ऑडीनेटर आणि इतर इनरव्हील क्लब आणि रोटेरियन्सनी कार्यक्रमास उपस्थित राहून नवीन टिमचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. नूतन इनरव्हील क्लब पनवेल सिटीच्या उपाध्यक्षा ध्वनी तन्ना यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जनहित नव्हे 'रिट' दाखल करा; मालमत्ता करविरोधी याचिकेवर उच्च न्यायालयाचे आदेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेने लागू केलेला थकीत मालमत्ता कर चुकीचा असून त्या विरोधात येथील काही सामाजिक संस्थांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. यावर गुरुवारी सुनावणी होणार असल्याने याकडे मालमत्ताधारकांचे लक्ष लागून होते. मात्र न्यायालयाने मालमत्ता कराविरोधात जनहित याचिका होऊ शकत नाही, मात्र रिट दाखल करा असे आदेश याचिकाकर्त्यांना दिले आहेत.

दरम्यान, आदेशानंतर या समाजमाध्यमांवर याचिका फेटाळली असे संदेश प्रसारित होत आहेत. यावर याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली नसून घटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत या याचिकेचे रूपांतर करण्याचे निर्देश दिले असल्याचे स्पष्टीकरण दिले आहे.

न्यायलयाच्या आदेशानंतर पनवेलमधील मालमत्ताधारकांत संभ्रम वाढला असून पालिका प्रशासन थकीत कर भरणा करण्यासाठी दबाव वाढवण्याची शक्यता आहे. खांदेश्वर वसाहतीमध्ये राहणारे सामाजिक कार्यकर्ते महादेव वाघमारे यांनी गेल्या वर्षी ८ ऑक्टोबरला मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक ८९–२०२१ दाखल केली होती.

या याचिकेमधून महाराष्ट्र राज्य सरकार व पनवेल पालिकेविरोधात करप्रणालीचे धोरण यावर लक्ष वेधण्यात आले होते. याबाबत गुरुवारी सुनावणी झाली. यावर पालिकेच्या बाजू मांडणाऱ्या सरकारी वकीलांनी सामाजिक कार्यकर्ते वाघमारे हे पालिकेचे करदाते नाहीत तसेच पालिकेचा कर भरण्याचा मुद्दा जनहित याचिका कसा असू शकतो, असा मुद्दा उपस्थित केला.

यावर याचिकाकर्ते वाघमारे यांच्या वकिलांनी वाघमारे हे कामगार व इतर क्षेत्रांतील अनेकांच्या न्याय हक्कासाठी झगडत असल्याचे दाखले न्यायालयात दिले. यावर न्यायालयाने जनहित याचिकेऐवजी वाघमारे यांच्याकडे नैसर्गिक न्याय मिळवण्याचे इतर पर्याय असल्याचे म्हटले आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, मौजे : गोरठण (ब्रु), तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत ही मधुरा मधुकर म्हसे यांच्या हिश्श्याची / मालकीची असून ती मिळकत, आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| गाव | गट क्रं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| गोरठण ब्रु. | ३१/२ | ०–२८–६० पो.ख. ०–०४–०० गुंठा एकूण ०–३२–६० | ३.०६ |

तसेच सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्याच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस चार्ज ॲटेचमेंट, लीज भाडेपट्टा, पोटगी मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्कातील खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासही १४ दिवसात, लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. या प्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्री, हस्तांतरण व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याचीनोंद घ्यावी.

पनवेल
दि.०७/०५/२०२२

सही/–
वकील सौ.वैष्णवी विलास माळी
सागर लक्ष्मी को.हौसिंग सोसायटी,
तळमजला, शिवाजी रोड, पनवेल,
जिल्हा : रायगड–४१०२०६
मो.नं.८४२५९१४६३७



**जाहीर नोटीस**

प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) श्री.मुकूंद कमळू जांभळे, रा.डोलघर, ता.पनवेल, जि.रायगड मौजे : डोलघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट क्र.१३, हिस्सा क्र.२, ८ अ खाते क्र.१००, धारणाधिकार–भोगवटादार वर्ग १ ज्याचे जिरायत क्षेत्र ०–०५–६० (हे.आर.पॉ.) + पोटखराबा क्षेत्र ०–००–०० (हे.आर.पॉ.)= असे एकूण क्षेत्र ०–०५–६० (हे.आर.पॉ.) व आकार रु.०=७५ पैसे पेकी जिरायत जमीन विक्रीचे क्षेत्र ०–०५–६० (हे.आर.पॉ.) + पोटखराबा क्षेत्र ०–००–०० (हे.आर.पॉ.) = असे एकूण क्षेत्र ०–०५–६० (हे.आर.पॉ.) म्हणजेच ५६० चौ.मीटर्स मात्र इतक्या क्षेत्रफळाची मिळकत ही वाडवडिलार्जित मालकी हक्काने गेली १५ वर्षे उपरोक्त शेतजमीन मालक क्रमांक १ यांच्या कुटुंबाच्या निर्विवादपणे ताबेकब्जा व वहिवाटीत आहे. त्यानुसार सदर मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खुशखरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध, दान, तारण, गहाण, बक्षिस, फरोक्त, अन्न, वस्त्र, पोटगी, दिवाबत्ती, वहिवाट, कुळ, विश्वस्त, मुखत्यार, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडपेट्टा, मृत्यूपत्र, इजमेंट, वारसाहक्क, बयाणा, तबदील या अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत खाली सही करणार यांचेकडे योग्य त्या सर्व मुळ कागदपत्रे व पुराव्यांसह लेखी हरकती खालील पत्यावर दाखल कराव्यात. त्याप्रमाणे मुदतीत लेखी हरकती व पुरावे न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या उपरोक्त मालकांसोबत ''खरेदीचा'' व्यवहार पूर्ण करतील व सदर नोटीसीच्या मुदतीनंतर येणाऱ्या व या जाहिरातींच्या विरुद्ध वर्तमान पत्रात जाहीर केलेल्या हरकती कोणत्याही सुचना व हरकती, माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

दि.०७/०५/२०२२

सही/–
ॲड.श्री.सचिन मा.कल्याणकर
प्लॉट क्र.१४२/अे, पहिला मजला,
मिडलक्लास हौ.सो.लि., युनियन
बँकेच्या वर गांधी हॉस्पिटल बाजूला,
सुरुची हॉटेल समोर, मुंबई पुणे हायवे,
पनवेल, जि.रायगड–४१०२०६
मो.क्र.९७६८३६६७१४/९८७०९८६१६५



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : नेरेपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथील महसूल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत श्री.शशिकांत काळु रोडपालकर, श्री.अरुण चंपालाल जैन, श्री.पद्माकर शशिकांत रोडपालकर, श्री.प्रमोद कुमार नंबियार तसेच श्री.लालु कुमार कुष्वाह, रा.पनवेल, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिल जय हनुमान को.ऑप.हौ.सोसायटी, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड कायम खरेदीखताने विकत घेणार आहेत.

**मौजे : नेरेपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे**

| मौजे | गट व उपविभाग क्र. | भोगवटादार वर्ग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| नेरेपाडा | १४७/१ | १ | ०–३५–४० पो.ख.०–०१–०० एकूण ०–३६–४० | ०.९१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लीज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्तदावा, वारसाहक्क, लायसन्सी, लीन, टेनन्सी, वील, अन्नवस्त्र, पोटगी, ताबेकब्जा, हवाला, अदलाबदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत लेखी पुराव्यासह पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कुणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व मागाहून कोणत्याही स्वरुपाची हरकत घेतल्यास ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०६/०५/२०२२

सही/–
ॲड.योगेश एन. केळकर
रा.६१९, बापटवाडा, टिळक रोड,
रतन टॉकीज जवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
मो.क्र.९३२२८२७४०६

# संक्षिप्त...

## २३ टन सिमेंटचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२३ टन खुले सिमेंट ज्याची किंमत १ लाख ८८ हजार १७० रुपये इतकी असून त्याचा अपहार केल्याची घटना कळंबोली परिसरात घडली आहे .

उरण सिमेंट कॅरिअर या ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये चालक म्हणून काम करणाऱ्या राजकुमार हरदेव याने ट्रकमध्ये १ लाख ८८ हजार १७० रुपये किमतीचे २३ टन खुले सिमेंट भरले होते .

सिमेंट गोरेगाव येथे पोहचविणे अपेक्षित होते , परंतु त्याने सिमेंटचा परस्पर अपहार करून ट्रक एसीसी कंपनीच्या समोर उभा करून पळून गेला आहे .

हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर त्याच्याविरोधात कळंबोली पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल आहे.

## लाकडी दांडक्याने केली पायावर व छातीवर मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भंगाराच्या दुकानातील भंगार चोरी करत असताना मालकाला फोन करून कळवल्याचा राग मनात धरून तीन इसमांनी ५५ वर्षे इसमाला लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचा प्रकार तोंडरे येथे घडला आहे. या प्रकरणी तिघांवर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तोंडरे येथे राहणारा भक्त बहादुर डलबहादुर हा इमरान शेख याच्या भंगाराच्या दुकानात देखरेख करतो. तो मूळचा नेपाळ येथील आहे. ४ मे रोजी रोहन, भाया व ऋतिक हे तिघे जण येऊन भंगाराच्या दुकानातील भंगार चोरी करत होते. याची माहिती मालक इम्रान शेख यांना फोन करून भक्त बहादूर याने कळवले.

त्या गोष्टीचा राग आल्याने रोहन, भाया, ऋतिक यांनी भक्त बहादूर याला लाकडी दांडक्याने पायावर व छातीवर मारून शिवीगाळ व दमदाटी केली. व ते मोटरसायकलवरून निघून गेले.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# म्हसळ्यातील १० ग्रामपंचायतींचा कारभार हाकणाऱ्या सरपंच-उप सरपंच सुमारे १ वर्ष मानधनापासून वंचीत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**




राज्यातील ग्रामपंचायतींना देण्यात येणारे मासिक मानधन आता थेट बँकेत ऑनलाइन पद्धतीने जमा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामुळे ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यां प्रमाणे सरपंच, उपसरपंचांचे मानधन तसेच बैठकीच्या भत्त्यांचे मानधनही थेट बँकेत जमा होणार आहे. त्यामुळे कारभारात आणखी पारदर्शकता येईल, असे शासनाचे धोरण असताना म्हसळा तालुक्यातील १० ग्रामपंचायतींच्या सरपंच– उप सरपंचाना गेले सुमारे १ वर्ष जिल्हा प्रशासनाने मानधनापासून वंचीत ठेवल्याचे पुढे येत आहे. कारण अतिशय शुल्लक असून तांत्रिक बिघाडाचे निमित्त पुढे केले असून तालुका ग्रामपंचायत विभाग जिल्हयाकडे बोट दाखवत आहेत.

महिन्याच्या पहिल्या तारखेलाच या पदाधिकाऱ्यांना मानधन मिळावे म्हणून राज्य सरकारने अध्यादेश जारी केला आहे. त्यानुसार राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाइन पद्धतीने थेट बँकेत जमा करण्यात येते. सरपंच, उपसरपंचाचे मानधन व ग्रामपंचायत सदस्यांना बैठक भत्ताही ऑनलाइन पद्धतीने त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याच्या प्रस्तावाला राज्य सरकारने मान्यता दिली. राज्य सरकारने ३० जुलै१९ रोजी अध्यादेश जारी करून राज्यातीलग्रामपंचायतींच्या सरपंचाचे मानधन वाढविण्याचा निर्णय़ घेतला होता. त्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाइन पद्धतीने थेट बँकेत जमा करण्यात येते. सरपंच, उपसरपंचाचे मानधन व ग्रामपंचायत सदस्यांना बैठक भत्ताही ऑनलाइन पद्धतीने त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा प्रस्ताव सरकारकडे विचाराधीन होता.

त्या प्रस्तावाला राज्य सरकारने मान्यता दिली.राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत बँकेतील खाते क्रमांकामध्ये मानधनाची रक्कम जमा करून संबंधितांना अदा करण्यात यावे असे आहे. 'दर महिन्याला प्रत्येक ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच तसेच सदस्यांचे लॉग इन करून माहिती अद्ययावत करावी. सरपंच, उपसरपंच व सदस्यांमध्ये बदल झाला असेल, तर दर महिन्याला ग्रामसेवकाने संबंधितांची माहिती अद्ययावत करावी. ही माहिती गटविकास अधिकारी तसेच ग्रामपंचायत पंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी खातरजमा करावी. तसेच मानधन व सदस्य बैठक भत्ता संबंधितांच्या खाते क्रमांकावर त्याच दिवशी अथवा कार्यालीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी जमा करावा,' असे आदेश ग्रामविकास विभागाने दिले आसताना म्हसळा तालुक्यातील १० ग्रामपंचायती चे सरपंच मानधना पासून वंचित आहेत.

# माथेरान नगरपरिषदेने स्वत:ची रुग्णवाहिका उपलब्ध करावी ! स्थानिकांची मागणी

**दे.रायगड नगरी । माथेरान**

पर्यावरण दृष्टीने संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यामुळे माथेरान या पर्यटन स्थळावर कोणत्याही मोटार वाहनांना पूर्वीपासूनच बंदी घालण्यात आली होती परंतु रुग्णांच्या अत्यावश्यक सेवेसाठी त्याचप्रमाणे येणाऱ्या पर्यटकांना सुध्दा वेळप्रसंगी याचा लाभ होऊ शकतो या महत्वपूर्ण हेतूने याठिकाणी रुग्णवाहिका सेवा मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहे. आजवर अनेक दानशूर व्यक्तींनी अथवा खासदार निधीतून रुग्णवाहिका देणगी स्वरूपात रुग्णांच्या सेवेसाठी दिल्या आहेत.

सद्यस्थितीत इथे रुग्णांची संख्या वाढली असल्यामुळे दवाखान्यापासून ते (दस्तुरी नाका) मोटार वाहनतळापर्यंत तीनशे रुपये आकारले जात आहेत. दिवसभरात या गाडीच्या पहाटेपासून ते रात्री उशिरापर्यंत पंधरा ते वीस फेऱ्या होत आहेत त्यामुळे गाडीची किरकोळ दुरुस्ती आणि चालकांच्या वेतना व्यतिरिक्त दर महिन्याला एक लाखाच्या आसपास रक्कम जमा होत असल्याचा अंदाज नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे. एवढे मोठया प्रमाणात भरीव उत्पन्न रुग्णांच्या सेवेतून प्राप्त होत असल्याने नगरपरिषदेच्या माध्यमातून स्वतःच्या मालकीची रुग्णवाहिका असावी असे स्थानिक नागरिक बोलत आहेत.

मागील काळात ही रुग्णवाहिका तोट्यात जात असल्याचे समजले. परंतु भरीव उत्पन्न प्राप्त होत असताना ही गाडी तोट्यात का जात असावी असा प्रश्न सुध्दा नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. जर का ही रुग्णवाहिका तोट्यात दाखविण्याचा प्रयत्न केला जात असेल तर रुग्णवाहिकेच्या संबंधीत चालकांना बील बुक देण्यात यावे जेणेकरून जो रुग्ण अथवा जेष्ठ नागरिक या गाडीचा वापर करेल त्यांना रीतसर प्रवासाची पावती मिळू शकेल आणि यातूनच या गाडीच्या किती फेऱ्या झाल्या आहेत याचा हिशोब सुध्दा नगरपरिषदेला घेता येईल. त्यामुळे लवकरच नगरपरिषदेच्या संबंधीत अधिकारी वर्गाने नगरपरिषदेच्या उत्पन्नात भर पाडण्यासाठी चालकांना बिल बुके द्यावीत असे न केल्यास रुग्णवाहिका सेवेत मोठया प्रमाणावर काहीतरी गौडबंगाल होत असणार ? असेही सूर सर्वत्र ऐकावयास मिळत आहे.



# चुलत बहिणीवर अत्याचार प्रकरणी चौदा वर्षे सक्तमजुरी

### २०१५ मध्ये घडला होता गुन्हा, आरोपीला १ लाख रुपये दंड

**दै.रायगड नगरी । दिघी**

१५ वर्षीय अल्पवयीन बालिकेवर सकाळी आपल्या घराच्या माळ्यावर कामानिमित्त बोल–ावून अत्याचार करणाऱ्या ४० वर्षीय युवकाला माणगाव येथील सत्र न्यायाधीश व विशेष पोक्सो न्यायालयाचे न्यायाधीश पी पी बनकर यांनी १४ वर्ष सक्तमजुरी आणि एक लाख रुपये रोख दंड शिक्षा ठोठावली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात राहणारी १५ वर्षीय मुलगी ही नात्याने आपली चुलत बहीण आहे. हे माहीत असताना देखील आरोपी ने मुलीला आपल्या घरी कामानिमित्त बोलवून घराच्या माळ्यावर नेऊन तिच्यावर अत्याचार केले व याबाबतीत कुणाला सांगितल्यास घरच्यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. ही घटना २० फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी घडली होती.

दिघी सागरी पोलिसांनी या प्रकरणी पोक्सो कायदांतर्गत गुन्हा दाखल केला होता. गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहा पोलीस निरिक्षक संजय मोगले यांनी केला. बालिकेवर अत्याचार करणारा आरोपीस यास अटक करून मोगले यांनी त्याच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. न्यायालयात विशेष पोक्सो खटला सुरू झाला तेंव्हा निकाल देताना त्यात मुलीची साक्ष व वैद्यकीय पुरावे कामी आले.

उपलब्ध पुरावा आधारे अटकेपासून आजपर्यंत तुरूंगात असलेल्या आरोपीला न्यायालयाने चौदा वर्ष सक्तमजुरी आणि एक लाख रुपये रोख दंड अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात सरकार पक्षाच्या वतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता ऍड जितेंद्र म्हात्रे यांनी मांडली. दिघी सागरी चे पोलिस सहाय्यक पो–लीस उपनिरिक्षक यु एल धुमास्कर यांनी पैरवी अधिकाऱ्याची भुमिका बजावली तर महिला पोलीस हवालदार छाया कोपनार, हवालदार शशिकांत कासार तसेच शशिकांत गोवळकर व सोमनाथ ढाकणे यांनी तपासकामी सहकार्य केले. याशिवाय दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सध्याचे सहा पोलीस निरीक्षक संदीप पोमन व प्रकाश सुर्वे यांनी साक्षीदार व पंच यांच्या जबाब नोंदवण्यात महत्वाची भूमिका बजावली. गुन्हेगारांना शिक्षा होऊन समाजात योग्य संदेश दिल्याबद्दल पोलिसांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पनवेल परिसरात शिक्षणाचे व्यापारीकरण; नवीन प्रवेशासाठी ५० हजार ते एक लाखांचे डोनेशन दर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील काही खाजगी शाळांमध्ये नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून डोनेशन घेतले जात आहे. ती रक्कम ५० हजार ते एक लाख पर्यंत असल्याने पालक वर्ग आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीस आला आहे. त्याचबरोबर वार्षिक शैक्षणिक शुल्क सुद्धा त्या व्यतिरिक्त आदा करावे लागत असल्याने एक आर्थिक लुटीची बाराखडी सुरू असल्याचे चित्र आहे. संबंधित शिक्षण संस्थाचालकांवर कोणतीच कारवाई होताना दिसत नाही. त्यांच्या अनियंत्रित कारभारामुळे पालक वर्गांचे आर्थिक नुकसान होत आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचे गारुड मिरवत आहे. आपल्या मुलाला इंग्रजी शाळेमध्ये शिक्षण मिळावे या अनुषंगाने पालक वर्गांची धडपड सुरू असते, दिवसेंदिवस हे स्टेटस सिम्बॉल बनत चालले असून त्यामुळे इंग्रजी शाळांकडे विद्यार्थी आणि पालकांचा कल वाढला आहे. पनवेल परिसरात अनेक शैक्षणिक संस्थांनी शाळा सुरू केल्या आहेत. त्यामध्ये सीबीएससी आणि राज्य स्टेट बोर्ड चा अभ्यासक्रम असणाऱ्या शाळा या ठिकाणी आहे. पनवेल परिसरात सिडको वसाहतींमध्ये नवीन पनवेल, कळंबोली, खारघर या वसाहतीमध्ये एज्युकेशन हब निर्माण झाले आहे. त्यामुळे याच शाळांमध्ये आपल्या पाल्याला शिक्षण मिळावे यासाठी पालक वर्ग आग्रही असल्याचे दिसून येते. अगदी याच गोष्टींचा फायदा घेऊन नवीन प्रवेश घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्का व्यतिरिक्त डोनेशन घेतले जात आहे. ही रक्कम भरमसाठ असून ५० ते एक लाख रुपये इतकी देणगी नवीन प्रवेशासाठी शैक्षणिक संस्थांकडून घेतली जात आहे. डोनेशन आणि प्लस फी ही रक्कम लाखांच्या घरात जात असून इतर शैक्षणिक साहित्य त्याचबरोबर गणवेश तसेच वर्षभरातील वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी वेगळे पैसे द्यावे लागत आहेत. एकाच घरातील दोन विद्यार्थी असल्यास पालकांना आपला खिसा शाळांमध्ये रिकामा करावा लागत आहे. शिक्षणाला व्यापारी करणाचे स्वरूप काही संस्थाचालकांनी दिले आहे. इतका मोठ्या रक्कमा पालकांकडून वसूल केल्या जात असून संबंधितांवर शिक्षण विभागाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राजरोसपणे अशा प्रकारचे डोनेशन पालकांकडून घेतले जात आहे.

**सवलतीच्या दरात भूखंड ;तरीसुद्धा पालकांची लूट अखंड**

अनेक शैक्षणिक संस्थांना सिडकोने सवलतीच्या दरात शाळा बांधण्यासाठी भूखंड दिले आहेत. याचा प्रमुख उद्देश म्हणजे सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना माफक दरात शिक्षण च्या सुविधा शाळांकडून दिल्या जातीच असाच आहे. मात्र संबंधित शिक्षण संस्थांनी सवलतीच्या दरात भूखंड घेऊन त्याठिकाणी इमले बांधले आहेत. मात्र विद्यार्थ्यांना आणि पालकांना कोणतीही सूट किंवा सवलत दिली जात आहे. त्यामुळे कमी किमतीत भूखंड दिले जात असले तरी पालकांची अखंड लूट या शाळांमध्ये सुरू आहे.

**फी स्ट्रक्चर कागदावर मात्र डोनेशनची रक्कम ओरली**

नवीन पनवेल येथील एक ऐतिहासिक नाव असलेल्या शाळेमध्ये इयत्ता २री साठी ४७ हजार रुपये डोनेशन सांगण्यात आले. सिनियर केजी करीता ४१ हजार रुपये भरावे लागतील असे तेथील कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले. याबाबत आपणास कोणतीही लेखी दिले जाणार नाही. मात्र वार्षिक फी चे स्ट्रक्चर तुम्हाला दिले जाईल असे सांगण्यात आले. दोन विद्यार्थ्यांसाठी तब्बल ८६ हजार इतके डोनेशन सांगण्यात आले. आणि वार्षिक शुल्क हे जवळपास साठ हजारांच्या घरात जाणार आहे. असे नाव न सांगण्याच्या अटीवर एका पालकाने सांगितले.

शाळांचा दर्जा पायाभूत सुविधा या नावावर फक्त मार्केटिंग केले जात आहे. वास्तविक पाहता अध्ययन अध्यापनाचे मंदिर म्हणजेच शाळा होय. परंतु या ठिकाणी आता व्यापारीकरण सुरू केले आहे. काही खाजगी शिक्षण संस्थांकडून पालकांची वारेमाप आर्थिक लूट केली जात आहे. याबाबत नियंत्रण नसल्याने लाखो रुपये डोनेशन आणि वार्षिक शैक्षणिक शुल्क पालकांकडून घेतले जात आहे. याबाबत शिक्षण विभागाने नियंत्रण आणणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे शुल्क ठरवून देऊन कोणत्याही प्रकारचे डोनेशन घेतले जाऊ नये याकरीता एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

**- ॲड सुलक्षणा जगदाळे**
**(शहर संघटिका, शिवसेना कामोठे)**

# देवता या समाजाचे अधिष्ठान : ह.भ.प.एकनाथ महाराज

**दै.रायगड नगरी । उरण**

प्रत्येक समाजातील धार्मिक भावना जागृत ठेवायची असेल तर मंदिर उभी राहिली पाहिजेत कारण देवता या समाजाचे अधिष्ठान असल्याने त्यांच्या शक्तितूनच प्रखर धार्मिक भावना टिकून राहते असे मौलिक विचार ह.भ.प. एकनाथ महाराज यांनी खोपटे येथे प्रवचनात व्यक्त केले.

खोपटे – बांधपाडा येथे मोरेश्वर श्रावण पाटील यांच्या कुटुंबियांनी बांधलेल्या संतोषी माता मंदिराच्या प्राण प्रतिष्ठा सोहळ्या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आज समाजातील धार्मिक भावना लोप पावत चालेली आहे. त्यासाठी आपल्या हिंदू देवदेवतां प्रती असणारी श्रद्धा व्यक्त करण्यासाठी मंदिरांचे महत्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे मोरेश्वर पाटील कुटुंबीयांचे कार्य अधोरेखित करणारे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या मंदिर प्राणप्रतिषठापना सोहळ्या प्रसंगी गोपाळ काका हरिपाठ मंडळाने सुश्राव्य हरिपाठ सादर केले त्याच प्रमाणे भजन,किर्तन सादर झाले.याप्रसंगी शेकडो नागरिकांनी सोहळ्याला हजेरी लावली.



# आज धानकान्हे येथे भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

शेतकरी सभा रोहे तालुका संघटनेचे वतीने आज दि.८ मे रोजी तालुक्यातील धानकान्हे येथे दु.३:३० वा.शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी शेतकरी सभा नेते काँ.रमेश ठाकूर, कामगार नेते काँ.अँड.विजय पाटील, शेतकरी नेते का.विजय मोहिते, व्हि.टी.देशमुख, उस्मान रोहेकर,जयवंत पोकळे, बाबूराव बामणे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार असून यावेळी शेतकरी सभा रोहे तालुक्याचे अध्यक्ष मधुकर सानप, उपाध्यक्ष शांताराम जाधव, सचिव सावित्रीबाई जगताप, मिलिंद पवार, सल्लागार राजेंद्र करवल, महिला विभाग सहसचिव साक्षी मोरे, खजिनदार राजेंद्र वाघमारे, गणेश म्हसकर यांच्यासह जगदिश जाधव, विश्वनाथ जाधव, प्रतिक्षा पडवल, मोहन ठाकूर, गुणाजी कोकळे, शंकर धनावडे, तुकाराम जाधव, सखाराम कचरे, अमित पडवळ, अँड.प्रविण दाभाडे, कायदेशीर सल्लागार जानकी कुळकर्णी, अँड. शंकर हरपाल आदी शेतकरी सभेचे.पदाधिकारी व सदस्य उपस्थित रा–हणार आहेत.सदरच्या मेळाव्यात शेतकरी वर्गाच्या ज्वंलत व प्रलंबित मागण्यांसाठी संदर्भात विचारविनिमय होणार असून जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी उपस्थित राहण्याचे अवाहन शेतकरी सभेच्या वतीने करण्यात आले आहे.

# फिर्यादीचा विश्वास संपादन करून ट्रकचा अपहार करणाऱ्या टोळीला पनवेल तालुका पोलीसांनी केले जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विश्वास संपादन करून ट्रक चा अपहार करणाऱ्या एका टोळीला पनवेल तालुका पोलिसांनी जेरबंद केल्याने सहा मोठे गुन्हे उघडकीस आणण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौडकर यशस्वी झाले आहेत.

विनोद रामराव पवार यांनी ट्रकचे मुळ मालक सुधाकर गायकवाड यांचेकडुन करारनामा करून विकत घेतलेला टाटा कंपनीची ट्रक ( बल्कर ) चक्र१३–द४१०९ हा एच . पी . पेट्रोलपंपाच्या बाजुला पुणेकडे जाणाऱ्या रस्त्यावर अजिवली , ता . पनवेल , जि . रायगड या ठिकाणी पार्क करून ठेवलेला असताना ट्रक वरील चालक नामे अजिम सलीम पठाण अजिम सामीलखाँ पठाण, रा . रहेमतपुर, जि.सातारा याने त्यांचे समतीशिवाय लबाडीच्या इराद्याने सदरचा ट्रक चोरी करून नेला अशा आशयाची फिर्याद प्राप्त झाल्याने पनवेल तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. प्रस्तुत गुन्हयाच्या तपासा दरम्यान यातील आरोपी नामे अजिम सलीम पठाण अजिम सामीलखाँ पठाण, मु.रेहमतपुर, ता.कोरेगाव जि. सातारा. यास तांत्रिक




तपासाचे आधारे खारघर येथून अटक करण्यात आली. सदर आरोपीकडे चौकशी केली असता त्याने सदरचा ट्रक हा लोकेश एस. सांजिवैय्या वय ३५, धंदा गाडया खरेदी विकी करणे, राह . घर नं . ७२ , बटवाडी , बी.एच.रोड मु.पो.जि. राज्य कर्नाटक व झाकीर हुसेन मोहम्मद साब परदेवाले वय ४५ वर्षे , गाडया खरेदी विक्री करणे , राह . कुस्तगी चाळ , एस.एस. कॉलेज जवळ , गांधीनगर , मु . पो . बेटगेरी , जि . गदक , राज्य कर्नाटक , यांना विक्री केल्याचे सांगितले .

सदर आरोपीना बेंगलोर व कर्नाटक येथून अटक करण्यात आली . अटक आरोपीकडे सदर गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी करता त्याने प्रस्तुत गुन्हयात चोरी केलेला ट्रक हा कोटा, राजस्थान येथे विक्री केल्याचे सांगितले. सदर चोरी झालेला २०,००,००० / – रु . किं . चा टाटा कंपनीचा १४ चाकी ट्रक (वलकर) चक्र३ / –द / ४१०९ , भिलवाडा , राजस्थान येथुन हस्तगत करण्यात आलेला आहे . तपासा दरम्यान यातील फिर्यादी यांनी ट्रकचे मुळ मालक सुधाकर गायकवाड यांची परवानगी न घेता तसेच व्यवहार पुर्ण न करता प्रादेशिक परिवहन विभागाचे पुर्व परवानगीशिवाय पासिंग असलेला बल्कर काढुन तो परस्पर विकला व त्यावर चौकोनी बॉडीलावून सदरचा ट्रक त्याच्याकडे काम करीत असलेल्या चालकाने चोरी केल्याचा बनाव करून स्वतःच्या फायद्या करीत ट्रक परस्पर विकून पोलीसात खोटी फिर्याद दिल्याचे निष्पन्न झाले त्यानुसार त्याला अटक करण्यात आली आहे व त्याच्या कडून विविध ठिकाणचे सहा गुन्हे उघडकीस आण्यात आले आ–हेत. सदर तपास पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ चे शिवराज पाटील, सहा. पोलीस आयुक्त भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौडकर, पोनी अंकुश खेडकर, गुन्हे प्रगटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक अविनाश पाळंदे, सहा पोलीस निरीक्षक संजय गळवे, सपोउनि मनोहर चव्हाण, पोहवा विकास साळवी, पोहवा मंगेश भूमकर, वैभव शिंदे, पोना राकेश मोकल, पोशी भीमराव खताळ, तुकाराम भोये, पोना जयदीप पवार, पोना पंकज चांदीले, प्रकाश मेहेर, सुनिल कुदळे या पथकाने केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे